सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण**
**एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,**
**E-MAIL ID –lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७**

---

प्रेस नोट क्र. ०६ दि. १८.०२.२०२६

# २४ तासात तपास पुर्ण करुन दोषारोपत्र न्यायालयात दाखल, आरोपीस १ वर्षे सक्त मजूरी आणि ५००० रु दंडाची शिक्षा

----------ooooo----------

श्री डॉ.डी.एस.स्वामी,पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी ठाणे ग्रामीण पोलीस घटकात महिला विषयक दाखल होणाऱ्या गुन्हयाचा जलद गतीने तपास पुर्ण करुन मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करुन न्यायालयात खटला फास्ट-ट्रॅकवर चालविणेबाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सुचना व मार्गदर्शन करण्यात आले.

मा.पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली मुरबाड पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. I २४०/२०२५ भा.न्या.सं कलम ७४, ३३३, ३५२, ३५१(२)(३) या दाखल गुन्हयाचे अनुषंगाने तत्कालीन प्रभारी अधिकारी श्री संदीप गिते यांनी दाखल गुन्हयाचे महत्व लक्षात घेता, तपासीक अंमलदार युनुस तडवी, मुरबाड पो.ठाणे यांना गुन्हयाचा तपास तत्परतेने पुर्ण करुन दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करणेबाबत आदेशीत केले.

प्रस्तुत गुन्हयातील आरोपीत यास पोहवा/युनुस तडवी, पोहवा/नितीन घाग,पोना/देवरे,पोना/उबाळे या पथकाने तात्काळ अटक करुन त्याच्या विरुध्द सक्षम पुरावा गोळा करुन २४ तासाच्या आत गुन्हयाचा तपास पुर्ण करुन मा. प्रथमवर्ग न्यायालय, मुरबाड येथे दोषारोपपत्र दाखल केले. प्रस्तुत गुन्हयाचा खटला फास्ट-ट्रॅकवर चालवित ६ महिने २७ दिवसात आरोपीतास दोषी ठरवुन १ वर्षे सक्त मजुरी,५०००/- रु दंडाची शिक्षा सुनावली आहे. शासकीय अभियोक्ता,श्रीमती लिना साठे मॅडम यांनी प्रस्तुत गुन्हयाच्या सुनावणीचे काम-काज पाहिले.

मा.श्री डॉ. डी. एस. स्वामी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, मा.श्री अनमोल मित्तल, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, मा.उप-विभागीय पोलीस अधिकारी,श्री अनिल लाड, पोलीस निरीक्षक श्री संदिप गिते, पोलीस निरीक्षक,श्री दादासो ऐडके यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हयाचे तपासीक अंमलदार युनुस तडवी यांनी गुन्हयाचा तपास केला असुन कोर्ट डयुटी अंमलदार/रुपाली पवार व पैरवी अधि. वसावे यांनी खटला सुनावणी वेळी साक्षीदार, पंच यांना त्यांच्या साक्षीचे महत्व पटवुन दिले. पोहवा/युनुस तडवी,पोहवा/नितीन घाग,पोना/देवरे, पोना/उबाळे, मपोशि/पवार,पोहवा/वसावे यांनी आपले कर्तव्य उत्कृष्टपणे बजावीत उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

****************************************************************